# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:25.06.2025** **वारःशुक्रवार**

---

1. भारत ब्रिटन दरम्यान ऐतिहासिक मुक्त व्यापार करारावर स्वाक्षरी
2. ब्रिटनचा यशस्वी दौरा आटोपून पंतप्रधान नरेंद्र मोदी आजपासून दोन दिवसांच्या मालदीव दौऱ्यावर
3. महाराष्ट्र सर्वच महत्त्वाच्या आर्थिक क्षेत्रांमध्ये अग्रेसर - मॉर्गन स्टॅनले संस्थेचा अहवाल
4. दिल्लीतल्या जेएनयु विद्यापीठात छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्र आणि कुसुमाग्रज विशेष केंद्राचंही उद्घाटन आणि
5. फिडे महिला बुद्धिबळ विश्वचषक स्पर्धेत भारताचं जेतेपद निश्चित; दिव्या देशमुख आणि कोनेरु हंपी यांच्यात होणार अंतिम लढत

**<u>पंतप्रधान ब्रिटन करार</u>**

भारत आणि ब्रिटननं काल ऐतिहासिक मुक्त व्यापार करारावर स्वाक्षरी केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांच्यात लंडनमध्ये झालेल्या बैठकीनंतर या करारावर स्वाक्षरी करण्यात आली. आजचा दिवस दोन्ही देशांसाठी ऐतिहासिक दिवस असल्याचं मोदी यांनी यावेळी सांगितलं. हा करार भारतातले शेतकरी, मासेमार, सुक्ष्म लघू आणि मध्यम उद्योजक तसंच तरुणांसाठी विशेष लाभदायक ठरेल, असा विश्वास पंतप्रधान मोदी यांनी व्यक्त केला.

भारत-यूके हा महत्त्वाचा मुक्त व्यापार करार - व्यापार, गुंतवणूक आणि रोजगाराला चालना देईल असं केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी म्हटलं आहे. या अभूतपूर्व करारामुळे शेतकरी, लघु उद्योजक, एमएसएमई क्षेत्रे, स्टार्टअप्स आणि इतर सेवा क्षेत्रांना फायदा होईल असं त्यांनी सांगितलं.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या व्यापार करारामुळे, महाराष्ट्रासाठी अमर्याद संधींची कवाडं खुली झाल्याचं सांगून कराराचं स्वागत केलं आहे.

**<u>मोदीचार्ल्स</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल इंग्लंडमधील सद्रिंगहम इस्टेट इथे, किंग चार्ल्स तिसरे, यांची भेट घेतली. या भेटीत त्यांनी भारत-यूके द्विपक्षीय मुद्द्यांवर तसंच उभय देशांच्या संबंधांमधील प्रगतीवर चर्चा केली. आयुर्वेद, योग आणि मिशन लाईफ मुळे होणाऱ्या फायद्यांबद्दल यूकेमध्ये जाणीव निर्माण करण्याच्या अनुषंगानं त्याला कशा प्रकारे प्रोत्साहन देता येईल याबद्दलही त्यांनी चर्चा केली. यावेळी पंतप्रधानांनी

‘एक पेड मां के नाम’ अभियानाचा भाग म्हणून किंग चार्ल्स यांना एक रोपटं त्यांच्या निवासस्थानाच्या आवारात लावण्यासाठी भेट दिलं.

**<u>मोदी</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आजपासून दोन दिवसांच्या मालदीव दौऱ्यावर जात आहेत, मोदी यांची ही तिसरी मालदीव भेट आहे. राष्ट्राध्यक्ष डॉ. मोहम्मद मुइझ्झू यांच्या कारकीर्दीतला मोदी यांचा मालदीवचा हा पहिलाच दौरा आहे. या दौऱ्याविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून . . .

**<u>स्क्रिप्ट</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वागतासाठी मालदीव्जची राजधानी माले पूर्णपणे सज्ज आहे. ठिकठिकाणी तिरंगा ध्वज आणि प्रधानमंत्र्यांच्या स्वागताचे फलक झळकत आहेत. या भेटी दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मालदीव्जचे राष्ट्रपती डॉ. मोहम्मद मुइज्जु ‘Comprehensive Economic and Security Maritime Partnership’ च्या प्रगतीचा आढावा घेतील. यासह दोन्ही देशांमध्ये काही द्विपक्षीय करार देखील होण्याची शक्यता आहे. भारताच्या मदतीने साकारलेल्या काही पायाभूत सुविधा प्रकल्पांचं उद्घाटनही पंतप्रधानांच्या हस्ते होईल. उद्या मालदीव्जचा हिरक महोत्सवी स्वातंत्र्य दिन आहे आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी या सोहळ्याचे प्रमुख पाहुणे असतील. दोन्ही देशांमधल्या राजनैतिक संबंधांचंही हे हिरक महोत्सवी वर्ष आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या या दौऱ्यामुळे दोन्ही देशातल्या संबंधांना आणखी गती मिळेल अशी आशा आहे.

**<u>शाह राष्ट्रीय सहकार धोरण</u>**

केंद्र सरकारनं, केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह यांच्या उपस्थितीत काल नवी दिल्लीत राष्ट्रीय सहकार धोरण २०२५ जाहीर केलं. सहकार हा विचार समोर ठेवून हे धोरण ठरवण्यात आलं असून, विकसित भारताच्या संकल्पाला हे धोरण उपयोगी ठरेल, तसंच २०२७ मध्ये भारत जगातील तिसरी आर्थिक महासत्ता होईल, असा विश्वास शाह यांनी व्यक्त केला.

**<u>संसद</u>**

विविध मुद्द्यांवरून विरोधकांनी केलेल्या गदारोळामुळे संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज कालही दिवसभरासाठी तहकूब झालं. लोकसभेचं कामकाज सुरुवातीला दुपारी २ वाजेपर्यंत आणि त्यानंतरही गदारोळ सुरूच राहिल्याने अखेर दिवसभरासाठी तहकूब केलं गेलं. राज्यसभेत काल उपाध्यक्ष हरिवंश यांनी नवनियुक्त सदस्य उज्ज्वल निकम यांना शपथ दिली. कार्यकाळ पूर्ण करणाऱ्या सहा निवृत्त सदस्यांना काल सभागृहात निरोप देण्यात आला. राज्यसभेतही विरोधी पक्ष सदस्यांनी बिहारच्या मुद्द्यावर घोषणाबाजी करत गदारोळ केल्यानं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

**<u>मोर्गन</u>**

महाराष्ट्र सर्वच महत्त्वाच्या आर्थिक क्षेत्रांमध्ये अग्रेसर आहे असा अहवाल - मॉर्गन स्टॅनले या गुंतवणूक बँकिंग तसंच वित्तीय संशोधन क्षेत्रातील प्रसिद्ध जागतिक वित्तीय संस्थेने प्रकाशित केला आहे. या अहवालात महाराष्ट्र अनेक क्षेत्रांचं नेतृत्व करत असल्याचं नमूद करण्यात आलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या अहवालाचं आणि त्यातील निष्कर्षांचं स्वागत केलं आहे.

अहवालातील हे निष्कर्ष म्हणजे आपल्या राज्याने विविध क्षेत्रांसाठी स्वीकारलेली धोरणं आणि त्यानुसार सुरू असलेली त्याची सकारात्मक वाटचाल यांचं द्योतक असल्याचं म्हटलं आहे.

**फडणवीस जेएनयु**

दिल्लीतल्या जवाहरलाल नेहरू विद्यापीठात छत्रपती शिवाजी महाराज सामरिक आणि संरक्षण विशेष अध्यासन केंद्राची पायाभरणी, तसंच कुसुमाग्रज मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती विशेष केंद्राचं उद्घाटन काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झालं. या अध्यासन केंद्राच्या स्थापनेची घोषणा गेल्या वर्षी राज्य सरकारनं केली होती. त्यासाठी १० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला होता. जवाहरलाल नेहरू विद्यापीठाच्या कुलगुरू शांतिश्री पंडित, राज्याचे मराठी भाषा मंत्री उदय सामंत, छत्रपती शिवाजी महाराजांचे वंशज बाबाजीराजे भोसले आदी मान्यवर या समारंभाला उपस्थित होते.

**जलशक्ती**

गंगा नदी आणि तिच्या उपनद्यांच्या पर्यावरणीय प्रवाहावर लक्ष देण्याकरताची एक महत्त्वाची बैठक जलशक्ती मंत्री सीआर पाटील यांनी काल नवी दिल्ली इथे घेतली. नद्यांमध्ये पाण्याचा प्रवाह वाढविण्यासाठी, नदीच्या परिसंस्थांचं जतन करण्यासाठी आणि जलसंपत्तीच्या संतुलित वापरासाठी- एक ठोस आणि समग्र कृती आराखडा विकसित करण्यावर पाटील यांनी यावेळी भर दिला. अतिरिक्त पाण्याचा वापर आणि प्रदुषणाला तोंड देणाऱ्या प्रदेशांमध्ये अखंड प्रवाह टिकवण्यासाठी तसंच एकूणच नदीच्या परिसंस्थेचं आरोग्य सुधारण्यासाठी एकत्रित प्रयत्न करण्यावर या चर्चासत्रात भर देण्यात आला.

**हल्कहोगन**

जगप्रसिद्ध मल्ल - हल्क होगन यांचं काल अमेरिकेत फ्लोरिडा इथे
हृदय विकाराच्या तीव्र झटक्यानं निधन झालं. ते ७१ वर्षांचे होते. त्यांनी वर्ल्ड Wrestling एन्टरटेनमेंट अर्थात WWE विजेतेपद मिळवलं होतं.

**अपघात**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हिमाचल प्रदेशातील मंडी इथे झालेल्या दुर्दैवी अपघातातल्या जीवितहानीबद्दल दुःख व्यक्त करून मृतांच्या नातेवाईकांना पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधी मधून प्रत्येकी दोन लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. काल हिमाचल प्रदेश रोड ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशनची बस मंडी जिल्ह्यातील मासेरन तरंगलाजवळ एका खोल दरीत कोसळून ८ जणांचा मृत्यू झाला तर २१ जण जखमी झाले होते.

**रशिया विमान अपघात**

रशियाच्या डोंगराळ अशा अमूर प्रदेशात, अंगारा एअरलाइन्सचं An-24 हे विमान कोसळून झालेल्या अपघातात पाच मुलं आणि सहा कर्मचारी यांच्यासह सर्व ४९ जणांचा मृत्यू झाला. लँडिंगच्या काही वेळापूर्वीच या विमानाला हवेत आग लागली. टिंडा पासून सुमारे १० मैल अंतरावर एका दुर्गम उतारावर विमानाचे अवशेष सापडले असून डोंगराळ प्रदेश आणि घनदाट जंगलांमुळे बचाव कार्यात अडथळा निर्माण होत आहे. या  अपघातात झालेल्या जीवितहानीबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शोक व्यक्त केला आहे.

**<u>फिडे महिला</u>**

बातुमी इथे  सुरू असलेल्या फिडे महिला विश्वचषक बुद्धिबळ स्पर्धेत भारताचं जेतेपद निश्चित असून; स्पर्धेच्या अंतिम फेरीत, कोनेरु हंपी आणि दिव्या देशमुख या दोन भारतीय महिलां दरम्यान  लढत होणार आहे. काल गुरुवारी झालेल्या उपान्त्य फेरीत, दिव्या देशमुख हिने चीनची ग्रँडमास्टर तान छोंग्यी हिला मात दिली, तर कोनेरु हंपीनं चीनच्याच - लेईतिंगजेइ हिला पराभूत केलं.

कोनेरु हंपी बुद्धिबळ विश्वचषक स्पर्धेच्या उपान्त्य फेरीत पोहोचणारी पहिली भारतीय महिला ठरली आहे.

**<u>हवामान</u>**

ओडिशा, पश्चिम बंगाल, छत्तीसगड आणि महाराष्ट्राच्या काही भागात आज अतिमुसळधार पावसाचा इशारा भारतीय हवामान विभागाने दिला आहे. मध्य प्रदेश, विदर्भ, छत्तीसगड, ओडिशा, पश्चिम बंगाल आणि झारखंडमध्ये सोमवारपर्यंत मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. दिल्ली-एनसीआरमध्ये आज विजांसह हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे.

## या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.